आषाढी यात्रेत 'लालपरी' ठरली लाखो भाविकांची विश्वासाची सोबती! >> पान 2

प्रधानांच्या राजीनाम्यानंतर कॉकरोच जनता पार्टीची पुढची चाल काय? ५ ऑगस्टला महत्त्वाची बैठक >> पान 3

अकलकोस गावातील विकासाचा अनुशेष भरून काढणार: पालकमंत्री जयकुमार रावल >> पान 4


सुविचार
स्वत:चा आत्मसन्मान कधीच विकू नका.


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 19 ■ सोमवार, दि. 03 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





'मुसाफिर कॅफे'च्या प्रीतीचं मराठी कनेक्शन; अभिनेत्री महिमा मकवाना म्हणाली, मी पक्की मराठमोळी आहे
आतील पान


## अपक्ष खासदार पप्पू यादव यांच्यावर चाकू हल्ल्याचा प्रयत्न; हल्लेखोराला समर्थकांनी चोपलं

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** पूर्णियाचे अपक्ष खासदार पप्पू यादव (राजेश रंजन) यांच्यावर आज रविवारी (२ ऑगस्ट) त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद सुरू असताना चाकूहल्ल्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली. या प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पप्पू यादव पत्रकार परिषद घेत असताना एक व्यक्ती त्यांच्या निवासस्थानी पोहोचला आणि त्यानं चाकूनं हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. मात्र, उपस्थित समर्थकांनी तत्काळ त्या व्यक्तीला पकडून त्याची धुलाई केली. त्यानंतर आरोपीला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं. या घटनेनंतर पप्पू यादव यांनी ही आपली हत्या करण्याचा कट असल्याचा दावा केला. संबंधित व्यक्ती चाकू घेऊन आला होता आणि यापूर्वीही आपल्याला धमक्या मिळाल्या होत्या, असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, पोलिसांनी आरोपीकडून चाकू जप्त केल्याची माहिती समोर आली असून संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. घटनेनंतर प्रतिक्रिया देताना खासदार पप्पू यादव म्हणाले, "माझ्या घरात घुसून माझ्यावर हल्ला करण्याची हिंमत कशी झाली? तो व्यक्ती चाकू घेऊन मला मारण्यासाठी आला होता. यापूर्वीही मी अनेक तक्रारी (एफआयआर) दाखल केल्या आहेत. माझे वकीलही इथं उपस्थित आहेत. मी घाबरणार नाही. कोणाला मला मारायचं असेल तर मारून टाका. काही तथाकथित बाबा मला रोज जीवे मारण्याच्या आणि जाळून टाकण्याच्या धमक्या देत होते. माझ्या हत्येचा कट रचण्यात आला होता, मात्र सुदैवानं मी बचावलो.

# राज्यात धर्मांतरविरोधी कायदा लागू

## जबरदस्तीने धर्मांतरासाठी १० वर्षांपर्यंत कारावास

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात जबरदस्तीने आणि आमिष दाखवून होणारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्य विधिमंडळाने मंजूर केलेला धर्मस्वातंत्र्य कायदा आता राज्यात लागू झाला आहे. या कायद्यानुसार आता धर्मांतरासाठी जबरदस्ती करणार्यांना सात ते दहा वर्षे कारावास होणार असून, धर्मांतरासाठी प्रलोभन दाखवणे, दिशाभूल करणेही महागात पडणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या मंजुरीसोबतच अधिकृत राजपत्रात (गॅझेट) प्रकाशित झाल्यानंतर राज्यात धर्मांतरविरोधी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य



कायदा २०२६' लागू झाला आहे. ३० जुलै रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्यापासून हा कायदा आता अंमलात आला आहे. त्यामुळे बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये नव्या कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रलोभन दाखवून किंवा बळजबरीने होणारे धर्मांतर रोखण्यासाठीचे विधेयक राज्य विधिमंडळाच्या मार्च २०२६ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन्ही सभागृहांत मंजूर झाले होते. त्यानंतर ते मान्यतेसाठी राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले होते.

### भाजपची आश्वासनपूर्ती

सत्ताधारी भाजपने धर्मांतरविरोधी कायदा करण्याचे आश्वासन निवडणुकीच्या प्रचारात दिले होते. त्यानुसार बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतरास प्रतिबंध करण्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद असलेला कायदा अस्तित्वात आला आहे.

### सात ते दहा वर्षे शिक्षेची तरतूद

- नव्या कायद्यानुसार दोषींना पहिल्या अपराधासाठी सात वर्षांपर्यंत कारावास.
- पुन्हा गुन्हा करणाऱ्यांसाठी १० वर्षांपर्यंतच्या कैदेची तरतूद.
- धर्मांतरापूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ६० दिवस आधी सूचना देणे या कायद्यानुसार अनिवार्य.
- धर्मांतरित व्यक्तीचे पालक, भावंडे, इतर नातेवाईकांना तक्रार करण्याचा अधिकार.

### न्यायालयात आव्हान देणार : प्रकाश आंबेडकर

जबरदस्तीने आणि आमिष दाखवून होणारे धर्मांतर रोखण्यासाठी केलेल्या धर्मस्वातंत्र्य कायद्याला वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी विरोध केला आहे. या कायद्याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## केरळम, कर्नाटकात पावसाचे ११ बळी; केदारनाथ मार्गावर दरडी कोसळल्या

### हजारो नागरिक स्थलांतरित; अनेक राज्यांमध्ये पूरस्थिती

**नवी दिल्ली।वृत्तसंस्था :** देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. केरळम, कर्नाटक, उत्तराखंड, जम्मू-कश्मीर आणि गुजरातसह विविध भागांत अतिवृष्टीचा फटका बसला असून आतापर्यंत अनेक ठिकाणी जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. केरळममध्ये पूर आणि भूस्खलनामुळे ८ जणांचा मृत्यू झाला असून ८ जण बेपत्ता आहेत, तर कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यात दरड कोसळून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला.

केरळममध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. राज्य सरकारच्या माहितीनुसार, आतापर्यंत ५ हजार ७९२ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले असून त्यांच्यासाठी २०९ मदत छावण्या सुरू केल्या आहेत. अतिवृष्टीमुळे २७ घरे उद्ध्वस्त झाली असून १९६ घरांचे नुकसान झाले आहे. अलप्पुझा जिल्ह्यात ११ मदत छावण्यांमध्ये १६९ कुटुंबांतील सुमारे ५८० नागरिकांना आश्रय दिला आहे.

कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यात रविवारी पहाटे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली. डोंगराजवळील घरावर दरड कोसळल्याने मल्लिकार्जुन (वय ३५), त्यांची पत्नी नागवेणी (२८) आणि त्यांचा तीन वर्षांचा मुलगा संतोष यांचा मृत्यू झाला. घटनेच्या वेळी तिघेही घरात झोपले होते. मुसळधार पावसामुळे डोंगराळ भागांमध्ये दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत.

### गुजरातमध्येही पावसाचा जोर

गुजरातमधील अनेक भागांत मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती आहे. मोरबी आणि सुरत शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचले. सुरतमध्ये काही भागांतील रस्ते आणि घरांमध्ये दोन ते तीन फूट पाणी भरले. किम नदीची पाणीपातळी वाढल्याने नागरिकांना स्थलांतर करावे लागले.

## २० वर्षांखालील मुलांसाठी इन्स्टाग्रामसह फेसबुक ब्लॉक करा

### आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या मुलीची पंतप्रधानांकडे मागणी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावर कॉकरोच जनता पार्टीनं जोरदार आंदोलन केलं. यावेळी आंदोलक विद्यार्थ्यांनी सरकार, केंद्रीय शिक्षण मंत्री आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी एका अल्पवयीन मुलीनं पंतप्रधान मोंदींच्या विरोधात एका अल्पवयीन मुलीनं आक्षेपार्ह शब्दांत घोषणाबाजी केली होती. तिची ही प्रतिक्रिया सोशल मीडियावरही तुफान व्हायरल झाली. या घटनेची दखल थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेत तिला माफ केल्याचं एका व्हिडिओमार्फत सांगितलं आहे. पंतप्रधान मोदींच्या या कृतीमुळं संबंधित मुलीच्या आईनं मोदींचे आता आभार मानलेत. यावेळी मुलीच्या आईनं आपल्या मुलील जीवनदान मिळालं, अशी भावना व्यक्त केली.

सूडाऐवजी माझ्या मुलीला माफ केल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात जोडून आभार मानते. हा माझ्या मुलीसाठी दुसरा जन्म आहे. इतके घाणेरडे आणि अश्लील शब्द वापरणाऱ्या मुलीला माफ करून पंतप्रधान मोदींनी आपलं मोठेपण दाखवून दिलं. आज तिचा वाढदिवस



आहे. पंतप्रधान मोदींनी तिला सर्वात मोठी भेट दिली आहे, ती म्हणजे जीवनदान आहे. आज माझ्या मुलीचा पुनर्जन्म झालाय," अशी भावना मोदीविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या अल्पवयीन मुलीच्या आईनं व्यक्त केली.

नीट-यूजी पेपरफुटीविरोधात दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली मोठं आंदोलन झालं. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य करून त्यांच्याविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी केली होती. यानंतर शुक्रवारी (दि.३१) पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करून विद्यार्थ्यांना संयम राखण्याचं आवाहन केलं होतं. आपल्याला शिवीगाळ करणारे भरकटलेले आहेत. राग किंवा सूड हे याचं उत्तर असू शकत नाही, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या व्हिडिओनंतर अल्पवयीन मुलीचा माफी मागतानाचा व्हिडिओ समोर आला. व्हिडिओमध्ये तिनं स्वतः चं वय १५ वर्षे असे आहे सांगितलं. यासह आणि आपल्या कृतीचं गांभीर्य समजल्याचं म्हणत मी जे काही केलं ते क्षमेच्या पात्र नाही. मी खूप वाईट गोष्टी बोलले आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

'कनॉट प्लेसचा फेरफटका मारल्यानंतर मी आपल्या मित्रांसोबत आंदोलनाच्या ठिकाणी गेले होते. यावेळी पंतप्रधान मोदींच्या विरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी करणाऱ्या लोकांच्या प्रभावाखाली आले होते. ही आपली पहिली आणि शेवटची चूक आहे. मी संपूर्ण देशाची माफी मागते. मला खूप लाज वाटत आहे. मी स्वतःच्या नजरेला नजरही देऊ शकत नाही. कृपया मला माफ करा," असं अल्पवयीन मुलीनं सांगितलं.

अल्पवयीन मुलीनं पंतप्रधान मोदींची माफ मागितली असली तरी अपमानास्पद घोषणाबाजी केल्याप्रकरणी मुलीविरुद्ध नोएडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. नोएडा पोलिसांनी झिरो एफआयआर नोंदवला होता. यानंतर ही तक्रार नवी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली. तक्रारदारानं आरोप केलाय की, अल्पवयीनं मुलीच्या वक्तव्यानं पंतप्रधानांच्या पदाच्या प्रतिष्ठेचा अपमान केला आहे. यामुळं समाजात तेढ निर्माण होऊ शकतो. यासह सार्वजनिक शांतता भंग होऊ शकते.

मी आणि तिनं वारंवार माफी मागितली आहे. तसंच एफआयआर मागं घेण्याचं आवाहन केलं आहे. माझी मुलगी १५ वर्षांची अल्पवयीन असतानाही एफआयआरमध्ये तिचं वय चुकीचं म्हणजे २५ वर्षे नोंदवलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना माझी नम्र विनंती आहे की, कृपया २० वर्षांखालील मुलांसाठी इन्स्टाग्राम आणि फेसबुक ब्लॉक करा. त्यांना फक्त अभ्यास करण्याची परवानगी दिली पाहिजे. यासह त्यांना आंदोलनांमध्ये सहभागी होऊ देऊ नये. हे लोक फक्त मुलांचा फायदा घेऊ इच्छितात आणि त्यांच्याकडून काहीही बोलवून घेतात, असं अल्पवयीन मुलीच्या आईनं सांगितलं.

## वादग्रस्त वक्तव्यानंतर संजय राऊत अडचणीत; सोलापुरात गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर । प्रतिनिधी :** शिवसेना (उबाठा) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी जयकुमार गोरे यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्यानं सोलापुरात भाजपा कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जय कुमार गोरे हे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यानं सोलापुरात त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. त्यामुळं सोलापुरात संजय राऊत यांच्या विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.



### संजय राऊतांविरोधात गुन्हा दाखल

**संजय राऊतांविरोधात गुन्हा दाखल :** भाजपाचे नगरसेवक मनीष केत यांनी रविवारी दुपारी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात खासदार संजय राऊत यांच्या विरोधात फिर्याद दाखल केली. या फिर्यादीवरून संजय राऊत यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३५६(२) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राऊत यांच्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रात प्रथमच सोलापुरात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाल्याचा दावा भाजपाकडून करण्यात आला आहे.

**सोलापुरात संतप्त प्रतिक्रिया :** सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याविरोधात करण्यात आलेल्या अवमानकारक वक्तव्यामुळं सोलापूर शहर आणि जिल्ह्यात विविध स्तरांतून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी सकाळी संजय राऊत यांच्या पुतळ्याचं दहन करून निषेध नोंदविला. त्यानंतर भाजपाचे नगरसेवक मनीष केत यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दाखल केली.

**भाजपात संजय राऊत यांच्या विरोधात नाराजी :** भाजपाच्या म्हणण्यानुसार, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याविरोधात वक्तव्य करताना संजय राऊत यांनी आक्षेपार्ह भाषा वापरली. या निषेधार्थ सांगोला येथे भाजपा कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन करत राऊत यांच्या पुतळ्याचं दहन केलं. मोहोळ तालुक्यातील अनगर येथेही भाजपा कार्यकर्त्यांनी पुतळा जाळून निषेध व्यक्त केला. दरम्यान, सोलापूर शहर मध्यचे भाजपा आमदार देवेंद्र कोठे यांनी पत्रकार परिषद घेऊन संजय राऊत यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध करत त्यांच्यावर जोरदार टीका केली.




## तुकाराम मुंढेंच्या टीमने दुकानावर टाकली धाड, हाती लागलं 'पाकिस्तानी विष', संगमनेरमध्ये खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी हॉटेल, दुध डेअरी आणि खाद्य उत्पादक कारखान्यांवर कारवाईचा धडाका लावला आहे. अशातच आता अहिल्यानगरमध्ये केलेल्या धडक कारवाईमध्ये चक्क बंदी घातलेली पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनं सापडली आहे. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाने संगमनेर शहर पोलिसांच्या मदतीने गोल्डन मार्केटमधील दुकानावर छापा टाकला होता. ही कारवाई शनिवार १ऑगस्ट रोजी



दुपारी करण्यात आली होती. या कारवाईमध्ये पाकिस्तानात तयार होणारी 'गोरी ब्युटी क्रीम' आणि 'गोरी डे अँड नाईट क्रीम' चा विक्रीसाठी उपलब्ध असल्याचा मोठा साठा सापडला. तब्बल १२ हजार ९०० रुपयांचा पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

औषध निरीक्षक सोमनाथ मुळे यांच्या फिर्यादीवरून कारवाई करण्यात आली आहे. दुकानदार शाहीद रियाज शेख याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे. जप्त क्रीमवर "चरवश ळप झरज्ञळीींरप / झरज्ञळीींरप डीरपवरीव" असा उल्लेख आढळला आहे. धक्कादायक म्हणजे, भारतात विक्रीसाठी आवश्यक परवानगी नसतानाही ही सौंदर्य प्रसाधन उत्पादनं विक्रीसाठी ठेवल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

संबंधित दुकानदाराविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सगळे सौंदर्य प्रसाधने मानवी आरोग्यास घातक मानली जात आहे, या उत्पादनांच्या विक्रीबाबत एफडीए कडून पुढील तपास सुरू आहे. महिलांनी सौंदर्य प्रसाधन विकत घेत असताना ती कोणत्या कंपनीची आहे, कुठल्या देशातून आली आहे, याची तपासणी करूनच खरेदी करावी, असं आवाहनही अधिकाऱ्यांनी केले आहे.

## २०२९ ची राजकीय लढत भारताच्या नव्या मतदार पिढीच्या मनोवृत्तीवर अवलंबून असेल

नीट पेपरफुटीविरोधातील विद्यार्थी आंदोलनाने भाजपसमोर नवे आव्हान उभे केले आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर युवकांचा बदलता राजकीय कल, मोदी सरकारची रणनीती आणि विरोधकांची भूमिका याविषयी... सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षेपेक्षा कमी यश मिळाले. पक्षाला २४० जागांवर समाधान मानावे लागले. या निकालाने भाजपला स्पष्ट राजकीय संदेश दिला की, त्यांचे निर्विवाद वर्चस्व आव्हानरहित राहिलेले नाही. नरेंद्र मोदी यांना पराभूत करणे अशक्य नाही, अशी भावना इंडिया आघाडीत बळावली; परंतु हरियाणा, महाराष्ट्र, बिहार आणि आसाम विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या विजयाने विरोधकांना मोठा धक्का दिला. त्यानंतर शिवसेना, तृणमूल काँग्रेस आणि आम आदमी पक्षातील फुटीतून अनेक खासदार एनडीएमध्ये आले. परिणामी, लोकसभेत एनडीएची संख्या ३२४ वर पोहोचली. राज्यसभेतही एनडीए बहुमताच्या उंबरठ्यावर पोहोचली. त्यामुळे २०२४ मध्ये झालेल्या राजकीय नुकसानीची भरपाई भाजपने केली असून विरोधक पुन्हा बचावात्मक स्थितीत गेले; मात्र याच काळात नीट-यूजी परीक्षा पेपरफुटीचा वाद उभा राहिला आणि देशभर उसळलेल्या विद्यार्थी आंदोलनाने संपूर्ण राजकीय चर्चेची दिशा बदलून टाकली. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखाली नव्हते. पारंपरिक राजकीय अजेंडा नव्हता. सुरुवातीला सरकारने आंदोलनाला फारसे गांभीर्याने घेतले नाही; मात्र संसद मार्चवेळी विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती पाहून प्रशासनासोबत गुप्तचर यंत्रणांच्या आकलनातील त्रुटी उघड झाल्या. परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागल्याने सरकारला चर्चेचा मार्ग स्वीकारावा लागला. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनीही कबूल केले की, विद्यार्थी प्रतिनिधी अत्यंत ठाम आणि कठोर भूमिका घेणारे होते. त्यांना हलक्यात घेणे चुकीचे ठरले. सरकारला माघार घ्यावी लागली आणि संविधान क्लबमध्ये बैठक झाली. या घटनेने सरकारला विद्यार्थ्यांसमोर झुकावे लागल्याची प्रतिमा तयार झाली. हे आंदोलन फक्त नीटच्या पेपरफुटीपुरते मर्यादित नव्हते. त्यामागे अनेक वर्षांपासून साचत गेलेला तरुणांचा रोष होता. विविध स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार, भरती प्रक्रियेतील विलंब, बेरोजगारी, असुरक्षित भविष्य, सरकारी यंत्रणांवरील घटता विश्र्वास या सर्व प्रश्र्नांनी आंदोलनाला व्यापक सामाजिक आधार मिळवून दिला. हा तोच तरुणवर्ग होता, ज्याने २०१४ पासून भाजपला सर्वाधिक पाठिंबा दिला होता. १८ ते २९ वर्षे वयोगटातील सुमारे ३४ टक्के मतदार २०१४ मध्ये भाजपच्या बाजूने होते. २०१९ मध्ये हा आकडा ३६ टक्क्यांवर गेला आणि २०२४ मध्ये ३९ टक्क्यांपर्यंत पोहोचला. म्हणजेच भाजपची सर्वात मोठी राजकीय ताकद असलेला युवक वर्गच या आंदोलनात रस्त्यावर उतरला होता. आंदोलनात सहभागी अनेक विद्यार्थ्यांना २०२४ मध्ये मतदानाचा अधिकार नव्हता. तेव्हा ते ११ वी-१२वीत शिकत होते; मात्र २०२९ मध्ये हेच युवक प्रथमच मतदान करतील. जंतर-मंतरवरील बहुसंख्य तरुणांचे वय २० ते २५ वर्षे होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी प्रथमच पंतप्रधान झाले तेव्हा हे विद्यार्थी ८ ते १३ वर्षांचे होते. त्यांनी काँग्रेसचे शासन प्रत्यक्ष पाहिलेले नाही. त्यांची राजकीय जाणीव मोदी युगातच विकसित झाली आहे. म्हणूनच आंदोलनात पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात पोस्टर, घोषणाबाजी आणि उघड टीका मोठ्या प्रमाणावर दिसली. राजधानीत असा रोष यापूर्वी क्वचितच पाहायला मिळाला होता. हा केवळ सरकारविरोध नव्हता, तर संपूर्ण राजकीय आयुष्यात भाजपलाच सत्तेत पाहिलेल्या पिढीचा असंतोष होता. आज भाजपसमोर सर्वात मोठा प्रश्र्न असा आहे की, या आंदोलनामुळे तरुण मतदारांमध्ये निर्माण झालेली नाराजी कशी दूर करायची? पक्षाच्या अंतर्गत चर्चांमध्येही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेला धक्का बसल्याचे मान्य केले जात आहे. त्यामुळे युवकांना पुन्हा पक्षाशी जोडण्यासाठी धार्मिक आणि सांस्कृतिक अभियानांद्वारे युवकांशी नव्याने संवाद साधण्यावर भर दिला जात आहे. विरोधकांनी या आंदोलनाला राजकीय संधी म्हणून पाहिले. अधिवेशनात प्रियांका गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या बाजूने जोरदार भूमिका घेत सरकारवर हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनीही 'इडियट' आणि 'अंधभक्त' यांसारखे शब्द वापरत सरकार आणि भाजपवर निशाणा साधला. आंदोलनात विद्यार्थ्यांच्या पोस्टरमध्ये दिसणारी भाषा राहुल यांनी संसदेतून पुढे नेल्याचे दिसले. राहुल गांधी यांनी पंतप्रधान निवासस्थानाकडे मोर्चा काढला. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. कारवाईत त्यांच्या नाकातून रक्त आल्याची घटना आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना उचलून नेतानाची छायाचित्रे देशभर चर्चेचा विषय ठरली. आणीबाणीच्या काळात १९७७ च्या लोकसभा निवडणुकीवेळी तुरुंगात असलेल्या जॉर्ज फर्नांडिस यांचा हातात बेड्या असलेला फोटो देशभर गाजला. बिहारच्या मुजफ्फरपूर मतदारसंघात जातीय समीकरण त्यांच्या विरोधात असतानाही त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा मोठ्या फरकाने पराभव केला. त्या छायाचित्राने जनतेच्या भावनांना दिशा दिली होती. राहुल गांधी यांच्या जखमी अवस्थेतील छायाचित्रांमुळे युवकांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूती आणि आकर्षण वाढू शकते, अशी अपेक्षा काँग्रेसला आहे. राहुल गांधी यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली. विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध करत त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. 'कॉक्रोच जनता पार्टी'शी संबंधित युवकांनीही राहुल गांधींच्या काही मागण्यांना पाठिंबा दिला. विशेष म्हणजे, सोशल मीडियावर राहुल गांधींची खिल्ली उडवणाऱ्या युवकांपैकी काही वर्ग आता त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागल्याची चर्चा आहे. २०२९ मध्ये प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणांनी काँग्रेसकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास सुरुवात केली, तर भाजपसाठी ते अडचणीचे ठरू शकते. कारण, या पिढीने काँग्रेसचे शासन पाहिलेले नाही. त्यांनी फक्त भाजपचेच शासन अनुभवले आहे. तथापि, भाजपचे मत वेगळे आहे. पक्षाच्या मते या आंदोलनाचा थेट निवडणूक परिणाम होणार नाही. कारण, आंदोलनाचे नेतृत्व राहुल गांधी किंवा इंडिया आघाडीने केले नव्हते. भाजपचा युक्तिवाद असा आहे की, विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारने स्वीकारल्या आणि आंदोलनाचे नेतृत्व कोणत्याही विरोधी पक्षाकडे गेले नाही, तर जनतेसमोर असा संदेश जाईल की, विद्यार्थ्यांनी भूमिका मांडली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ती मान्य केली. अशा स्थितीत विरोधकांना त्याचा राजकीय लाभ मिळणे कठीण जाईल. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीकडे पाहताना केवळ पारंपरिक राजकीय समीकरणे पुरेशी ठरणार नाहीत. युवकांचा बदलता दृष्टिकोन, रोजगार, परीक्षा व्यवस्थेवरील विश्र्वास, शिक्षण, संधी आणि भविष्याबाबतची असुरक्षितता हे प्रश्र्न केंद्रस्थानी येत आहेत. जेन झी आंदोलनाने सरकारला संवादासाठी भाग पाडले, युवकांच्या असंतोषाला राष्ट्रीय स्वरूप दिले. भारताच्या राजकारणात युवक हा स्वतंत्र आणि निर्णायक राजकीय घटक म्हणून उदयास येत असल्याचे हे आंदोलन स्पष्टपणे दर्शवते. हा असंतोष कायम राहिला, त्याला संघटित राजकीय दिशा मिळाली, तर २०२९ ची लोकसभा निवडणूक सर्व राजकीय गणितांना छेद देणारी ठरू शकते. उलट सरकारने युवकांच्या प्रश्र्नांवर प्रभावी उपाययोजना करून त्यांचा विश्र्वास पुन्हा संपादन केला, तर भाजपचे वर्चस्वही कायम राहू शकते. त्यामुळे २०२९ ची राजकीय लढत भारताच्या नव्या मतदार पिढीच्या मनोवृत्तीवर अवलंबून असेल.

# आषाढी यात्रेत 'लालपरी' ठरली लाखो भाविकांची विश्वासाची सोबती!

## ५५०० बसेसद्वारे ९ लाखांहून अधिक भाविक-प्रवाशांचा सुखरूप, सुरक्षित प्रवास - परिवहन मंत्री सरनाईक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी** :पंढरीची वारी' ही महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेचा आत्मा आहे. विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे निघालेल्या लाखो भाविकांच्या प्रवासात यंदाही महाराष्ट्राची 'लालपरी' विश्वासाची सोबती ठरली. आषाढी यात्रेनिमित्त एसटी महामंडळाने सुमारे ५,५०० बसेसच्या माध्यमातून ९ लाखांहून अधिक भाविक-प्रवाशांना सुखरूप आणि सुरक्षित प्रवास घडविला. लाखो वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य एसटी परिवाराला लाभले, ही आमच्यासाठी विठुरायाची कृपाच असल्याची भावनिक प्रतिक्रिया परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

आषाढी यात्रेसाठी एसटी महामंडळाने राज्याच्या विविध भागांतून पंढरपूरसाठी विशेष वाहतुकीचे नियोजन केले होते. यात्रेच्या कालावधीत एसटीने २१ हजार ५२७ फेऱ्यांद्वारे ९ लाख २४ हजार ७३८ भाविक-प्रवाशांनी प्रवास केला असून, विशेष म्हणजे यात्रेच्या वाहतुकीतून एसटी महामंडळाला ४१ कोटी १८ लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळाले. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात सुमारे ५ कोटी ३० लाख रुपयांची वाढ झाली आहे.

याबाबत सरनाईक म्हणाले, गळ्यात तुळशीची माळ, मुखी विठ्ठलाचे नाम आणि मनात पांडुरंगाच्या भेटीची ओढ घेऊन लाखो वारकरी पंढरीच्या दिशेने निघतात. त्यांच्या या भक्तिमय प्रवासाचा एक छोटासा भाग होण्याचे भाग्य आपल्या लालपरीला दरवर्षी लाभते. एखाद्या भाविकाला विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला सुखरूप पोहोचवणे आणि दर्शनानंतर त्याला सुरक्षितपणे आपल्या कुटुंबापर्यंत पोहोचवणे, ही केवळ प्रवासी वाहतूक नाही; ती एसटीच्या माध्यमातून घडणारी विठ्ठलसेवाच आहे.

राज्यातील विविध विभागांतून आलेल्या बसेस, चालक-वाहक तसेच यांत्रिक, सुरक्षा आणि प्रशासकीय विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या यात्रेसाठी अहोरात्र मेहनत घेतली. भाविक-प्रवाशांना विविध सवलतींचा लाभ देत प्रचंड गर्दी, वाहतुकीचा ताण आणि हजारो फेऱ्यांचे नियोजन केले. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीतही भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटीच्या कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली. अशाच प्रकारे संपूर्ण राज्यातील प्रवासी हा आपला 'विठुराया' आहे, असे मानून 'प्रवासी देवो भवः' या भावनेतून एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने आपली सेवा बजावावी, असे आवाहन या निमित्ताने मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

वारीत चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याच्या पावलात जशी विठ्ठलभक्ती असते, तशीच या लाखो भाविकांची सेवा करणाऱ्या एसटीच्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कर्तव्यात मला विठ्ठलसेवा दिसते. आपल्या घरातील सण-उत्सव बाजूला ठेवून दिवस-रात्र सेवा देणाऱ्या चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, अधिकारी आणि पडद्यामागे कार्यरत प्रत्येक हाताचे मी मनापासून अभिनंदन करतो. ९ लाखांहून अधिक भाविकांना सुखरूप त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवणे, हेच आपल्या एसटी परिवाराने विठुरायाच्या चरणी अर्पण केलेले सेवेचे पुष्प आहे, असे सरनाईक यांनी सांगितले.




एसटी महामंडळ ही केवळ प्रवासी वाहतूक करणारी संस्था नसून महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाशी जोडलेली लोकवाहिनी आहे. पंढरीच्या वारीत लाखो भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि सुरक्षित प्रवासानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, हीच एसटीच्या सेवेची खरी कमाई आहे, असेही सरनाईक यांनी नमूद केले.

विठ्ठलाच्या दर्शनाची आस असलेल्या प्रत्येक भाविकाला सुरक्षितपणे पंढरीपर्यंत नेणे आणि पुन्हा सुखरूप घरी पोहोचवणे, हे आमचे कर्तव्यही आहे आणि भाग्यही. 'लालपरी'ची ही लोकसेवेची परंपरा भविष्यात अधिक सक्षमपणे पुढे नेऊ,'' असा विश्वासही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# सुनेत्रा पवारांनी बीड सोडताच मोठा राजकीय भूकंप!

## ६ महिन्यांची सत्ता संकटात? राजकारणात धक्कादायक ट्विस्ट

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड । प्रतिनिधी** : बीडच्या स्थानिक राजकारणात एका मोठ्या राजकीय भूकंपाची शक्यता निर्माण झाली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांचा दौरा आटोपताच बीडमध्ये सत्तांतराच्या चर्चांना वेग आला आहे. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी बीड नगरपरिषदेत महायुतीच्या पाठबळावर आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या सत्तेसमोर आता मोठे संकट उभे राहिले आहे. सत्ताधारी गटातील अनेक नगरसेवकांनी नाराजीचा सूर आळवल्याने नगरपरिषदेत सत्तांतराचे वारे वाहू लागले आहेत. त्यातच अनेक वर्षांचे कट्टर राजकीय वैरी असलेले क्षीरसागर बंधू एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्याने बीडच्या राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.



राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी नुकतीच बीडमध्ये जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली. त्या बैठक आटोपून निघून जाताच पाठीमागे बीडच्या राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे. सत्ताधारी नगरसेवकांच्या एका गटातील वाढत्या असंतोषामुळे नगरपरिषदेतील सत्तेचे गणित कधीही बदलू शकते, असा दावा केला जात आहे.

क्षीरसागर बंधू एकत्र येणार?

या सर्व घडामोडींमधील सर्वात मोठा राजकीय 'ट्विस्ट' म्हणजे भाजप नेते योगेश क्षीरसागर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यात मनोमिलन झाल्याची चर्चा आहे. भाजप नेते योगेश क्षीरसागर यांनी, ''बीडच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे,''

विशेष म्हणजे, या वक्तव्याला आमदार संदीप क्षीरसागर यांनीही तत्परतेने सकारात्मक प्रतिसाद दिला. ''जर अशी वेळ आली, तर आम्ही दोघे क्षीरसागर एकत्र बसण्यास तयार आहोत,'' असे स्पष्ट करत त्यांनी हात मिळवणीचे संकेत दिले आहेत. अनेक वर्षांचे राजकीय वैर विसरून जर दोन्ही क्षीरसागर बंधू एकत्र आले, तर बीड नगरपरिषदेत विजयसिंह पंडितांच्या नेतृत्वाला आणि सत्तेला मोठा सुरुंग लागू शकतो.

अवघ्या सहा महिन्यांपूर्वी स्थापन झालेली सत्ता धोक्यात आल्याने आमदार विजयसिंह पंडित यांच्यासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. जर नगरसेवकांचा नाराज गट आणि क्षीरसागर बंधूंचे नवे समीकरण प्रत्यक्षात आले, तर नगरपरिषदेचे सत्तापीठ कोणाकडे जाणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सत्तांतर घडणार की सत्ताधारी आपले संख्याबळ टिकवून ठेवणार, याचा निर्णय पुढील काही दिवसांतील राजकीय समीकरणांवर अवलंबून असेल.

### बारामतीत मोठं कांड! सरकारी नोकरीसाठी अर्ज केले अनब...११७ तरुण-तरुणींसोबत नको ते घडलं

**बारामती । प्रतिनिधी** : सरकारी नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या सुशिक्षित बेरोजगारांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणारे एक आंतरराज्यीय मोठे रॅकेट बारामतीत उघडकीस आले आहे. ''मंत्रालयातील बड्या अधिकाऱ्यांशी थेट ओळख आहे,'' असे भासवून भामट्यांनी तब्बल ११७ तरुण-तरुणींची ३ कोटी ७३ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. या रॅकेटने मंत्रालयाच्या नावाचे बनावट शिक्के, खोट्या निवड याद्या आणि बनावट नियुक्तीपत्रे देऊन तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त केले असून या घटनेमुळे संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या महाठगांनी मंत्रालयाचा तोरा दाखवत विविध सरकारी विभागांमध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले होते. यात आरोग्य विभाग, वन विभाग, जलसंपदा, समाजकल्याण विभाग आणि थेट भारतीय रेल्वे सारख्या हायप्रोफाईल खात्यांचा समावेश होता. आरोपींनी २०२२ पासून हा फसवणुकीचा धंदा सुरू केला होता. नोकरीच्या पदानुसार प्रत्येक उमेदवाराकडून ऑनलाईन आणि रोख स्वरूपात ५ ते ६ लाख रुपये उकळण्यात आले.


# नाशिकच्या खड्ड्यांवरून महायुतीतील दोन मंत्र्यांमध्ये जुंपली

## गिरीश महाजनांशी अबोला? छगन भुजबळांनी सगळंच सांगितलं, म्हणाले...

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक। प्रतिनिधी** : नाशिक शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि खड्ड्यांचा (इद्रूप्दते) प्रश्न आता राजकीय चर्चेचा विषय बनला आहे. शहरातील खराब रस्त्यांमुळे आतापर्यंत पाच नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री छगन भुजबळ यांनी प्रशासन आणि महापालिकेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी भुजबळांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देत आपली भूमिका स्पष्ट केली होती. यावरून छगन भुजबळ आणि गिरीश महाजन यांच्यात अबोला असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. आता या चर्चेवर छगन भुजबळ यांनी स्पष्टीकरण दिले आहे.





नाशिकमधील खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांवर बोलताना छगन भुजबळ यांनी संताप व्यक्त केला होता. त्यांनी रस्त्यांच्या कामातील निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित केले होते. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना मदत देण्याची मागणी केली होती. भुजबळ म्हणाले होते, ''जेवढे लोक मृत्यूमुखी पडले आहेत, ते शासनाच्या महापालिका यांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूमुखी पडले आहेत. एकाला जसा न्याय दिला तशीच रक्कम सर्वांना दिली पाहिजे. मंत्री गिरीश महाजनांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. जबाबदारी एकमेकांवर ढकलून चालणार नाही.'' भुजबळांच्या या वक्तव्यानंतर महायुतीतील दोन मंत्र्यांमध्ये मतभेद असल्याची चर्चा सुरू झाली होती. यावर आता गिरीश महाजन यांनी स्पष्टीकरण दिले होते.

गिरीश महाजन यांनी भुजबळ यांच्या विधानावर बोलताना म्हटले होते की, ''जबाबदारी माझी आहे, 'मी कुंभमेळा मंत्री आहे. यापूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणात कामे झाली होती का? नाशिककरांना त्रास होणार आहे हे मी सांगितले होते. डांबरी रस्ते टिकत नाहीत त्यामुळे व्हाइट टॉपिंग करत आहोत. चाळीस हजार कोटी खर्च करून चेहरा मोहरा बदलत आहे. एका रोडखाली सात प्रकारची युटिलिटी करत आहोत. सुविधा मिळणार आहे, कॅमेरा लावत आहोत. नवीन आणि मॉडर्न नाशिक आपण करत आहोत. येणाऱ्या सहा महिन्यात कामे पूर्ण होतील. नाशिककर म्हणतील आमच्या शहरासारखे शहर नाही,'' असे महाजन यांनी सांगितले.

दरम्यान, नाशिक खड्डे प्रकरणावरून छगन भुजबळ आणि गिरीश महाजन यांच्यात अबोला असल्याच्या चर्चांनाही वेग आला होता. यावर 'हे सगळं मीडियाने क्रिएट केलेलं पिक्चर आहे,' असे छगन भुजबळ यांनी सांगितले. नाशिक येथे आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक लोकार्पण सोहळ्यात झालेल्या प्रसंगाचा उल्लेख करताना भुजबळ म्हणाले, ''किंबहुना वरती हार घालायला जाताना गिरीश महाजन यांनी मला हात देऊन वर घेतले.'' तसेच पुढे ते म्हणाले, ''कोणी भाषण करत असतो त्यावेळी आपण त्यांचे ऐकत असतो किंवा आपल्याला पुढे काय बोलायचं याचा विचार करत असतो, त्यामुळे असं काहीही नाही,'' असे म्हणत गिरीश महाजन आणि आपल्यात कोणताही अबोला नसल्याचे स्पष्ट करत भुजबळांनी या चर्चांना पूर्णविराम दिला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### मुंबईत 'ब्रिक्स वेव्हज बाजार' मध्ये एकत्र येणार ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांतील ५०० हून अधिक प्रतिनिधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेले राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ ६ आणि ७ ऑगस्ट २०२६ दरम्यान मुंबईत 'ब्रिक्स वेव्हज बाजार'चे आयोजन करणार आहे. सृजनशील अर्थव्यवस्थेसाठी (क्रिएटिव्ह इकॉनॉमी) एक प्रमुख आंतरराष्ट्रीय बाजारपेठ म्हणून संकल्पित केलेल्या या बाजारात, ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांमधील ५०० हून अधिक प्रतिनिधी एकत्र येणार आहेत. यामध्ये भारत, तसेच इतर देशांतील सरकारे, उद्योग संस्था, आशय-निमिर्ते (क्रिएटर्स), चित्रपट निर्माते, गुंतवणूकदार, प्रसारक, ओटीटी प्लॅटफॉर्म्स, तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, सांस्कृतिक संस्था आणि विविध सर्जनशील उद्योगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मान्यवरांचा समावेश असेल.

ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांमधील सहकार्य अधिक मजबूत करणे हा 'ब्रिक्स वेव्हज बाजार'चा मुख्य उद्देश आहे. यासाठी श्राव्य-दृश्य आणि सर्जनशील क्षेत्रांमध्ये संवाद साधण्यास, नवीन व्यवसायाच्या संधी निर्माण करण्यास, ज्ञानाची देवाणघेवाण करण्यास आणि आंतरराष्ट्रीय भागीदारी उभारण्यास व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरातून लाखो नागरिकांना दिलासा

दैनिक आपला विदर्भ

**रायगड । प्रतिनिधी :** महिलांना उद्योजक बनवण्यासाठी राज्यात विविध योजना राबवल्या जात असून, राज्यातील प्रत्येक महिला लखपती आणि आत्मनिर्भर झाली पाहिजे, हे उद्दिष्ट प्रत्यक्षात उतरवण्याचे कार्य महिला व बालविकास मंत्रालयाच्या माध्यमातून सातत्याने होत असल्याचे प्रतिपादन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा, ऊर्जा, महिला व बालविकास आणि सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी पनवेल येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने पनवेल विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'च्या प्रसंगी त्या बोलत होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तसेच माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त निमित्त शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या शिबिराला सुप्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री यांची विशेष उपस्थिती लाभली होती.

शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या महसूल विषयक विविध तक्रारी व शासकीय कामांचा निपटारा एकाच छताखाली जलद गतीने करण्यात आला. याप्रसंगी जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, सातबारा उतारा आणि इतर आवश्यक कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून देत विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मंत्री मेघना बोर्डीकर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभाचे वाटप करण्यात आले.

### पेरूमध्ये पर्यटक विमान कोसळून १३ जणांचा मृत्यू; प्रवासी वारसा स्थळांना भेट देण्यासाठी निघाले होते

लिमा: दक्षिण अमेरिकेतील पेरूमध्ये एक छोटे विमान कोसळल्याने किमान १३ जणांचा मृत्यू झाला. अल जझिरा या वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, शनिवारी प्रवाशांना घेऊन जात असताना ही दुर्घटना घडली. मृतांपैकी बहुतांश पर्यटक होते आणि ते प्रसिद्ध नाझका लाइन्स पाहण्यासाठी जात होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. नाझका लाइन्स ही ऐतिहासिक पुरातत्त्व स्थळांची मालिका असून, यात जमिनीवर कोरलेल्या प्रचंड आकाराच्या आकृत्यांचा (जिओग्लिफ्स) समावेश आहे.

देशाच्या दक्षिण भागात असलेल्या अपघातस्थळी पत्रकारांशी बोलताना पोलीस मेजर जॉर्ज आंद्रेडे म्हणाले, ''११ प्रवासी आणि दोन कर्मचारी (क्रू मेंबर्स) यांचा मृत्यू झाल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे.'' स्थानिक प्रसारमाध्यमांच्या हवाल्याने अल जझिराने वृत्त दिले की, अपघातस्थळी वेगाने आग लागली होती, ज्यामुळे तातडीने बचावकार्य करणे अशक्य झाले. मिळालेल्या माहितीनुसार, या विमानाने इका विभागातील पिस्को येथून उड्डाण केले होते; मात्र अपघात नेमका कशामुळे झाला, याचे तपशील अद्याप उपलब्ध झालेले नाहीत.


# प्रधानांच्या राजीनाम्यानंतर कॉकरोच जनता पार्टीची पुढची चाल काय? ५ ऑगस्टला महत्त्वाची बैठक

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** कॉकरोच जनता पार्टीच्या कोअर कमिटीची बैठक मंगळवारी (५ ऑगस्ट) संघटनेचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी होणार आहे. या बैठकीत पक्षाच्या आगामी आंदोलनाची दिशा, नवीन मुद्दे आणि पुढील भूमिका यावर चर्चा करून निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतर इथं करण्यात आलेल्या आंदोलनानंतर कॉकरोच जनता पार्टीची देशभर चर्चा झाली होती. या आंदोलनाला समाजमाध्यमांवरही मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर पक्षाच्या



पुढील वाटचालीबाबत विविध चर्चा सुरू असताना ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीनंतर घेतलेल्या निर्णयांची अधिकृत माहिती माध्यमांना दिली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली असून पक्षाचे प्रमुख अभिजीत दिपके यांनीही या बैठकीच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

**दिल्लीतील आंदोलनाला यश :** नीट पेपरफुटी प्रकरणानंतर विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत मोठी चिंता व्यक्त होत होती. त्याच पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांवर कॉकरोच जनता पार्टीची चर्चा सुरुवात झाली. सीजेपीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. या मागणीसाठी विविध टप्प्यांमध्ये आंदोलनं करण्यात आली. त्यानंतर दिल्लीतील जंतर-मंतर इथं आमरण उपोषण सुरू करण्यात आलं. या आंदोलनाचं नेतृत्व अभिजीत दिपके आणि शास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांनी केलं. आंदोलनाला अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि सिनेकलाकारांनी पाठिंबा दिला. सुमारे ३६ दिवसांच्या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. त्यामुळे कॉकरोच जनता पार्टीची देशभरात मोठी चर्चा झाली.

**पुढील दिशा ठरवण्यासाठी बैठक :** दिल्लीतील आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीचार्जनंतर या आंदोलनाला अधिक व्यापक पाठिंबा मिळाला. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागणीला यश मिळाल्यानंतर आता पक्षाची पुढील भूमिका आणि आगामी आंदोलनांची दिशा काय असणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर ५ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरातील वाळूज येथील अभिजीत दिपकेंच्या निवासस्थानी कॉक्रोज जनता पार्टीच्या कोअर कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला जवळपास १५ सदस्य उपस्थित राहणार असून आगामी भूमिका आणि पुढील आंदोलनांबाबत चर्चा होणार आहे. बैठकीनंतर माध्यमांना अधिकृत माहिती दिली जाईल. या बैठकीला अभिजीत दिपकेंनी दुजोरा दिला असून, बैठकीपूर्वी याबाबत अधिक भाष्य करण्यास त्यांनी नकार दिला.

## जंतर मंतरवरील आंदोलनाबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वरिष्ठ नेत्याचा गंभीर आरोप,

# 'हे आंदोलन देशविरोधी होतं, संविधानविरोधात...'

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** जंतर मंतरवरील सीजेपीचं आंदोलन संविधानविरोधातील एक हत्यार होते. हे आंदोलन देशविरोधी, भारतविरोधी होते, असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांनी व्यक्त केलं. ते छत्रपती संभाजीनगरात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांताच्या नवीन प्रांत कार्यालयाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमात बोलत होते. डाव्या संघटनांनी त्यांच्या पर्यायी राजकारण अल्टरनेट पॉलिटिक्स या संकल्पनेचा यशस्वी प्रयोग सीजेपीच्या आंदोलनाच्या माध्यमातून केल्याचा आरोपही अतुल लिमये यांनी केला.

अतुल लिमये यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रामर ऑफ एनार्की या संकल्पनेचे उदाहरण देऊन बाबासाहेब आंबेडकर अनेक वर्षांपूर्वी ज्या धोक्याबद्दल आपल्या सावध करून गेले, त्या धोक्याला ओळखण्याची, त्याला डीकोड करण्याची आणि त्यासाठी तयार होण्याची गरजही अतुल लिमये यांनी बोलून दाखवली. पेपर फुटी विरोधात सुरू झालेले विद्यार्थ्यांचे आंदोलन योग्य कारणासाठी होते मात्र ते चुकीच्या हातांमध्ये गेले असं मतही लिमये यांनी व्यक्त केलं. विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेचे आकर्षण मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची शक्ती योग्य दिशेने वळवण्याची गरज आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हे काम योग्य तऱ्हेने करू शकते अशी अपेक्षाही अतुल लिमये यांनी व्यक्त केली.

**नेमकं काय-काय म्हणाले?**

- सीजेपीच्या आंदोलनाचे एक केस स्टडी म्हणून अभ्यास करण्याची आणि ते डिकोड करण्याची गरज आहे.
- या आंदोलनाची क्रोनोलॉजी काय, मेथोडोलॉजी, सपोर्ट सिस्टीम काय आणि त्या पाठीमागची विचारधारा कोणती हे समजण्याची गरज आहे.
- अभिजीत दिपके च्या भारत आगमनाला आणि त्यानंतर झालेल्या दिल्ली सह इतर शहरातील आंदोलनाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.



- २० जून नंतर सुरू झालेल्या ठिय्या आंदोलनाला टप्प्याटप्प्याने वाढता प्रतिसाद मिळाला. या काळात (दिपके च्या आगमनापासून २० जून पर्यंत) असं काय झालं असावं की या आंदोलनाचा स्वरूप बदलला?
- कोणती सपोर्ट सिस्टीम दीपकेच्या आंदोलनासोबत जोडली गेली हे शोधण्याची गरज आहे. जोडल्या गेलेल्या सपोर्ट सिस्टीम मध्ये अनेक डाव्या संघटना होत्या.
- त्या संघटनांची नावे तपासली तर या व्यासपीठावरून हिंदू विरोध का झाला, भारत तेरे तुकडे होंगे अशी घोषणा देणारे लोक या व्यासपीठावर का आले, या व्यासपीठाचा ताबा डाव्या संघटनांनी कसा घेतला, विद्यार्थ्यांचा आंदोलन राजकीय आंदोलन कसा रूपांतरित झाला, हे आपल्या लक्षात येतं.
- या आंदोलनाला समजून घेण्यासाठी योगेंद्र यादवांचा वाक्य लक्षात घ्या, योगेंद्र यादव म्हणाले की यापुढे या देशात लोकशाहीचा भवितव्य संसद नाही, तर रस्त्यांवर निर्धारित केलं जाईल, लोकशाहीची दिशा निवडणूकातून नाही, तर विरोधातून निश्चित होईल... योगेंद्र यादव च्या याच वाक्याला डी कोड करण्याची गरज आहे असेही अतुल लिमये म्हणाले..
- विद्यार्थ्यांचे आंदोलन योग्य कारणासाठी सुरू झाले होते, मात्र ते का भरकटले आणि ते डाव्या संघटनांच्या नियंत्रणात का गेले हे आपल्याला समजून येते.
- मुळात डाव्या संघटनांची पर्यायी राजकारण या नावाने एक संकल्पना आहे, बीजेपीच्या आंदोलनाच्या माध्यमातून डाव्या संघटनांनी त्याच संकल्पनेचा यशस्वी प्रयोग केल्याचे अतुल लिमये म्हणाले.

### पंतप्रधानांसह योगी आदित्यनाथ यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल, काय आहे कायदा?

रांची : तुम्ही सोशल मीडियात कोणत्याही व्यक्तीविरोधात टीका किंवा टिप्पणी करताना आक्षेपार्ह शब्द वापरणार असाल तर सावध राहा. कारण, आक्षेपार्ह शब्दांवरून थेट पोलीस गुन्हा दाखल करू शकतात. छत्तीसगडमध्ये अशीच घटना समोर आली आहे. छत्तीसगडची राजधानी असलेल्या रांचीमधील एका रहिवाशानं पंतप्रधान, गृहमंत्री आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांविरुद्ध आक्षेपार्ह टिप्पणी केली. सोशल मीडियावर केलेल्या या आक्षेपार्ह टिप्पण्यांबाबत आरोपीविरुद्ध रांचीमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि हटियाचे आमदार यांच्याविरुद्ध सोशल मीडियावर आक्षेपार्ह टिप्पण्या आणि धमक्या दिल्यानंतर, भाजपच्या 'नागरी मंडल'ने (स्थानिक शाखा) नागरी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. आक्षेपार्ह व्हिडिओ पोस्ट केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीविरुद्ध पोलिसांनी प्राथमिक आरोपपत्र (एफआयआर) दाखल केलं आहे.

नागरी येथील रहिवासी अलीम अन्सारी यानं एका व्हिडिओमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि हटियाचे आमदार नवीन जयस्वाल यांच्याविरुद्ध अपमानास्पद भाषेचा वापर केला, असा तक्रारीत आरोप करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, त्यानं आमदार नवीन जयस्वाल यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. भाजप नागरी मंडल अध्यक्ष रितेश राज महतो यांनी दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं आहे की, या व्हिडिओद्वारे धार्मिक भावना भडकवण्याचा आणि सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न केला करण्यात आला. तक्रारीनुसार, व्हिडिओमध्ये प्राणी वध आणि मांसाहाराबाबतची विधानेही आहेत. त्यामुळे परिसरात तणाव निर्माण होऊ शकतो, असे तक्रारीत म्हटलं आहे.

प्रकरणाचं कथित गांभीर्य लक्षात घेता, भाजपा नेत्यांनी आरोपीविरुद्ध 'भारतीय न्याय संहिता' च्या संबंधित कलमांखाली एफआयआर दाखल करून त्वरित कायदेशीर कारवाई करावी, अशी पोलिसांना विनंती केली आहे.

## झोपलेल्या चिमुरड्यांवर जन्मदात्या बापाकडूनच जीवघेणा हल्ला, मुलीचा जागीच अंत, मुलगा गंभीर जखमी; जळगाव हादरलं!

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील वडती गावात एका जन्मदात्या बापाने स्वत:च्या दोन निष्पाप लेकरांवर झोपेत असताना कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. या अमानुष हल्ल्यात १३ वर्षीय मीरा हिचा जागीच मृत्यू झाला, तर तिचा ११ वर्षीय भाऊ रामू गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, रविवारी पहाटेच्या सुमारास दोन्ही मुले घरात गाढ झोपेत होती. याचवेळी त्यांचे वडील सुभाष गोपाळ भिलाला (वय ५०) याने हातातील कुऱ्हाडीने दोन्ही मुलांवर अचानक हल्ला केला. झोपेत असल्यामुळे मुलांना स्वत:चा बचाव करण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. डोक्यावर आणि शरीरावर झालेल्या गंभीर वारांमुळे मीराचा जागीच मृत्यू झाला, तर रामू गंभीर जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच शेजारी आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी रामूला तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारांसाठी उच्चस्तरीय रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांकडून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

हल्ला केल्यानंतर आरोपी सुभाष भिलाला हा जवळील जंगलाच्या दिशेने फरार झाला. घटनेची माहिती मिळताच अडावद पोलीस ठाणे येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची नाकेबंदी करून व्यापक शोधमोहीम राबवली. काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडे हल्ल्यामागील कारणाबाबत कसून चौकशी सुरू आहे.

अडावद पोलिसांनी घटनास्थळी सखोल पंचनामा करून हल्ल्यात वापरण्यात आलेली कुऱ्हाड आणि इतर महत्त्वाचे पुरावे ताब्यात घेतले आहेत. मृत मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतर तपासाला अधिक दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास अडावद पोलीस करत आहेत.

# सिडको पोलिसांची मोठी कारवाई; २८ चोरीच्या मोटारसायकलींसह चार आरोपी जेरबंद

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** सिडको पोलिसांनी मोटारसायकल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत चार आरोपींना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून विविध कंपन्यांच्या २८ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची एकूण किंमत ११ लाख २० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दिनांक ५ जुलै २०२६ रोजी हरिओमनगर, जटवाडा रोड येथील रहिवासी संजय भगवान बडक यांच्या फिर्यादीवरून सिडको पोलीस ठाण्यात मोटारसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलीस उपनिरीक्षक अनिल नाणेकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मुख्य आरोपी योगेश कैलास गाडेकर याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने सिडको परिसरातील जाधववाडी, प्यासा वाईन शॉप परिसर, एम्स हॉस्पिटल, सारस्वत बँक, टीव्ही सेंटर आदी भागांतून मोटारसायकली चोरी करून त्या कन्नड तालुक्यातील साथीदारांकडे विक्रीसाठी पाठवत असल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी कार्तिक पवार, सौरभ वाघचौरे आणि राहुल बोरसे या साथीदारांना अटक केली.

आरोपींकडून सुरुवातीला ९ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. त्यानंतर पोलीस कोठडीत केलेल्या चौकशीत आणखी माहिती मिळाल्यानंतर राहुल बोरसेकडून ११ मोटारसायकली, तसेच इतर व्यक्तींना विकण्यात आलेल्या ८ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. अशा प्रकारे एकूण २८ चोरीच्या मोटारसायकली हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल नाणेकर, पोलीस उपनिरीक्षक अमोल जगताप,




पोलीस हवालदार मंगेश पवार तसेच पोलीस अंमलदार सहदेव साबळे, अमोल अंभोरे, प्रदीप फरकाडे, अतुल सोळुंके आदींच्या पथकाने केली.

## वृत्तविशेष...

### लग्नाच्या आमिषाने गुजरातच्या तरुणाची फसवणूक; लुटेरी दुल्हन अटकेत



**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर । प्रतिनिधी :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या लुटेरी दुल्हन टोळीचा सीताबर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. गुजरातमधील एका तरुणाकडून ७० हजार रुपये रोख आणि सोन्या-चांदीचे दागिने उकळल्याप्रकरणी मुख्य सूत्रधार राणी उर्फ कोमल पांडे हिला अटक करण्यात आली असून न्यायालयाने तिला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

फिर्यादी आकाश जिंदल पारेख हा विवाहासाठी वधूच्या शोधात असताना त्याचा राणी पांडे हिच्याशी संपर्क झाला. तिने स्वतःला नम्रता मालवीयची बहीण असल्याचे सांगत तिचे फोटो दाखवले. त्यानंतर आकाशला नागपूरमधील कोराडी परिसरातील एका घरात नेऊन नम्रताशी भेट घडवून आणण्यात आली. लग्नाच्या खर्चाच्या नावाखाली त्याच्याकडून ७० हजार रुपये रोख तसेच सोन्या-चांदीचे दागिने घेण्यात आले.

यानंतर सीताबर्डी येथील मंदिरात लग्नाची तयारी सुरू असताना एका व्यक्तीने नम्रता ही स्वतःची पत्नी असल्याचा दावा करत गोंधळ घातला. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आकाश पारेख यांनी सीताबर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तपासादरम्यान राणी उर्फ कोमल पांडे हिचा यापूर्वीही अशाच प्रकारच्या फसवणुकीच्या गुन्ह्यांत सहभाग असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध सुरू असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### संजय शिरसाट अन् बच्चू कडू अभिजीत दिपकेंना भेटल्यानंतर महायुतीत नाराजी

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे । प्रतिनिधी :** केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीच्या जंतर मंतरवर मोठे आंदोलन उभारले होते. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यासह तरूणांनी तब्बल एक महिना हे आंदोलन केलं. आंदोलनआधिक तीव्र झाल्यानंतर अखेर त्यानंतर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर अभिजीत दिपके (अंप्रूग्ज्झा) हे त्यांच्या मूळ गावी छत्रपती संभाजीनगर येथे परतले, त्यानंतर त्यांना भेटण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये अभिजीत दिपके यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली होती. दरम्यान त्यानंतर शिवसेनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी त्यांच्या घरी जाऊन दिपके यांची भेट घेतली. मात्र या भेटीवरून आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चांगलेच नाराज असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत.

### 'मुसाफिर कॅफे'च्या प्रीतीचं मराठी कनेक्शन; अभिनेत्री महिमा मकवाना म्हणाली, मी पक्की मराठमोळी आहे

**मुंबई । प्रतिनिधी :** नेटफ्लिक्सवरील 'मुसाफिर कॅफे' या वेबसीरिजची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या मालिकेतील 'प्रीती' ही भूमिका साकारणारी अभिनेत्री महिमा मकवाना हिच्या अभिनयाचे विशेष कौतुक होत आहे. हिंदी चित्रपट आणि मालिकांमधून प्रेक्षकांची मनं जिंकणाऱ्या महिमाचा महाराष्ट्राशी आणि मराठी संस्कृतीशी असलेला जवळचा संबंध अनेकांना माहीत नाही. राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीत तिने अनेक आठवणी सांगितल्या आहेत.

महिमा म्हणाली की, तिची आई महाराष्ट्रातील असल्यामुळे लहानपणापासूनच तिच्यावर मराठी संस्कृतीचे संस्कार झाले. ती मुंबईतील दहिसरमध्ये जन्मली आणि वाढली. दहिसरमधील मच्छी मार्केट परिसरात तिचं बालपण गेल्याचं सांगताना ती म्हणाली, यापेक्षा जास्त मराठमोळं काय असू शकतं? तिने सांगितलं की, तिचं आडनाव 'मकवाना' असल्यामुळे अनेकांना ती मराठी बोलू शकणार नाही, अशी शंका यायची. मात्र घरात आजही ती मराठीतच बोलते.

मी घरात मराठीच बोलते

महिमाने मुलाखतीत स्पष्ट सांगितलं की, लोकांना वाटतं मी गुजराती आहे म्हणून मला मराठी येत नसेल. पण मी घरी मराठीतच बोलते. मराठी ही खूप सुंदर भाषा आहे आणि मला तिचा खूप अभिमान आहे. ती पुढे म्हणाली की, तिची मराठी थोडी बोलीभाषेतील असली तरी ती मनापासून मराठीशी जोडलेली आहे.

# अक्कलकोस गावातील विकासाचा अनुशेष भरून काढणार: पालकमंत्री जयकुमार रावल

**दैनिक आपला विदर्भ**





**धुळे । प्रतिनिधी :** अक्कलकोस गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, गावातील मूलभूत सुविधांचा अनुशेष भरून काढण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

अक्कलकोस येथे आयोजित चावडी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, सरपंच उज्जनबाई जाधव तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, राज्यपालांच्या दौऱ्याच्या निमित्ताने अक्कलकोसच्या विकासाला अधिक गती मिळाली आहे. यापुढे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे गावाचे पालकत्व सोपविण्यात आले असून, दर चार महिन्यांनी विकास कामांचा आढावा घेतला जाईल. जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या समन्वयातून पायाभूत सुविधांचा टप्प्याटप्प्याने विकास केला जाईल.

देशाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधायचा असेल तर ग्रामीण भागाचा विकास अपरिहार्य आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. लोकांप्रती उत्तरदायी राहून काम करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी सांगितले.

गावात नवीन डांबरी रस्ते, शाळा व अंगणवाडी इमारतींची दुरुस्ती व रंगरंगोटी, धरणापर्यंतचा रस्ता, साठवण बंधारे तसेच इतर विकासकामे पूर्ण झाली असून, उर्वरित रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. आश्रमशाळेच्या नवीन इमारतीचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिले.

शबरी आवास योजनेअंतर्गत घरे, विहिरी आणि इतर विकासकामांमुळे गावात सकारात्मक बदल होत असल्याचे नमूद करत त्यांनी ग्रामस्थांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचना चावडी संवादातून जाणून घेत त्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते बिरसा मुंडा सभागृहाचे लोकार्पण, साठवण बंधाऱ्याचे लोकार्पण तसेच विविध शासकीय योजनांतील लाभार्थ्यांना लाभांचे वितरण तसेच वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमानंतर त्यांनी लाभार्थी शामराव सोनवणे यांच्या घरी भेट देऊन संवाद साधला.

## धक्कादायक! रस्ता नसल्यानं ५ किलोमीटर डोलीतून नेलं, पण रुग्णालय गाठेपर्यंत होत्याचं नव्हत झालं, सर्पदंशामुळं चिमुकल्याचा अंत, आदिवासी भागातील वास्तव समोर

**दैनिक आपला विदर्भ**


**ठाणे । प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. सर्पदंश झालेल्या ९ वर्षीय मुलाला रस्त्याअभावी वेळेत उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. जगन्नाथ दापट असं या इयत्ता चौथीत शिकणाऱ्या मुलाचं नाव आहे. गावापर्यंत रस्ता नसल्याने कुटुंबीयांना त्याला तब्बल ५ किलोमीटर डोलीतून पायी घेऊन जावे लागले. मात्र रुग्णालय गाठेपर्यंत खूप उशीर झाला आणि उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे आदिवासी भागातील मूलभूत सुविधांच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

ही धक्कादायक घटना शहापूर तालुक्यातील दहीगाव ग्रामपंचायत हद्दीतील शिसवली गावात घडली. जगन्नाथ दापट हा इयत्ता चौथीत शिक्षण घेत होता. शनिवारी मध्यरात्री झोपेत असताना त्याला विषारी सर्पाने दंश केला. प्रकृती बिघडताच कुटुंबीयांनी तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला. मात्र गावापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने त्याला डोलीतून तब्बल ५ किलोमीटर पायी नेण्यात आले. दहीगाव येथील मुख्य रस्त्यावर पोहोचल्यानंतर वाहनाने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तोपर्यंत सर्पदंशामुळे त्याची प्रकृती गंभीर झाली होती. डॉक्टरांनी उपचार सुरू केले, पण उपचाराला प्रतिसाद न मिळाल्याने दुसऱ्या दिवशी जगन्नाथचा मृत्यू झाला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्प अभियानाचा शुभारंभ

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती

**दैनिक आपला विदर्भ**



**नागपूर । प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्प अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'रामगिरी' येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती होती.

विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करताना व्यसनमुक्त, निरोगी आणि सक्षम युवा शक्ती घडविण्याचा संकल्प या अभियानाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे. युवकांनी अमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहून शिक्षण, कौशल्य, क्रीडा आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. व्यसनमुक्त भारत आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, पालक, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' हे अभियान युवकांमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती निर्माण करून त्यांना सकारात्मक, निरोगी आणि जबाबदार जीवनशैलीकडे प्रेरित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले आहे.

## शिक्षणमहर्षी दादासाहेब रावल संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानदान– पालकमंत्री जयकुमार रावल

**दैनिक आपला विदर्भ**



**धुळे । प्रतिनिधी :** शिक्षणमहर्षी दादासाहेब रावल यांच्या शैक्षणिक कार्यातून हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानदान मिळणार असून, या माध्यमातून सक्षम, सुसंस्कृत आणि राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान देणारी नवी पिढी घडेल, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. दोंडाईचा येथे श्री जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्रस्तावित इमारतीच्या भूमिपूजन समारंभात ते बोलत होते.

यावेळी आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, नगरसेविका सुभद्रादेवी रावल आदी उपस्थित होते. पालकमंत्री रावल म्हणाले की, विद्यार्थी संस्था ही मुळातच शिक्षणासोबत स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा देणारी संस्था म्हणून स्थापन झाली. या संस्थेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी घडले असून, भविष्यातही हजारो विद्यार्थी घडतील. शिक्षणाचे आणि ज्ञानदानाचे हे अत्यंत मोठे कार्य आहे. जगात भारताला महासत्ता बनवायचे असेल, तर शिक्षण हा त्याचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यत भारताला विकसित आणि महासत्ता राष्ट्र बनविण्याचा संकल्प केला आहे. त्या संकल्पपूर्तीसाठी आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.

सुमारे सहा लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या प्रस्तावित इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या इमारतीचे भूमिपूजन होत असून, हा धुळे जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. या संस्थेसाठी अडीचशे एकर जागा उपलब्ध आहे. सहकारमहर्षी दादासाहेब रावल यांनी सन १९५२ मध्ये ८० एकर जागा संस्थेला दान दिली. त्या काळातील त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज या संस्थेचा भक्कम पाया तयार झाला आहे.

त्यानंतर टप्प्याटप्प्याने दादासाहेब रावल एज्युकेशन सिटी उभी राहिली. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी ही संस्था शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनली आहे. सन १९२१ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेने शतकाहून अधिक काळ शिक्षणाबरोबरच राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि संस्कारांची परंपरा जोपासली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की, सन १९२१ मध्ये स्थापन झालेली ही संस्था शतकाहून अधिक काळ दुर्गम भागात शिक्षणाची अखंड ज्योत तेवत ठेवत आहे. विविध शाखांतील महाविद्यालयांचा समावेश असलेले हे शैक्षणिक संकुल दूरदृष्टीतून उभारले गेले असून, या भागात शिक्षणाचे प्रभावी जाळे निर्माण करण्यात संस्थेचे मोठे योगदान आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कृषी महाविद्यालयही या संकुलात कार्यरत आहे. तेथे शैक्षणिक, संशोधन आणि कृषीविषयक उपक्रम अत्यंत चांगल्या पद्धतीने राबविले जात असल्याचे समाधानकारक चित्र दिसून आले. या भागातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी हे शैक्षणिक संकुल अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

# वारी हनुमान येथे वाण नदीत तीन युवक बुडाले; दोघांना जीवदान, एकाचा मृत्यू

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या वारी हनुमान येथे सहलीसाठी गेलेल्या खामगाव तालुक्यातील खुंटपुरी येथील तीन युवक वाण नदीत बुडाल्याची दुर्दैवी घटना घडली. यातील दोघांना स्थानिकांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले, तर २४ वर्षीय योगेश प्रकाश वानखडे याचा बुडून मृत्यू झाला. रविवारी सकाळी स्थानिक आदिवासी युवक आणि पोलिसांच्या संयुक्त शोधमोहीमेनंतर त्याचा मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, खुंटपुरी येथील १० ते १२ मित्र खासगी वाहनाने वारी हनुमान येथे सहलीसाठी आले होते. दुपारी वाण नदीत पोहण्यासाठी उतरलेल्या तिघांचा पाण्याचा अंदाज चुकल्याने ते प्रवाहात वाहून जाऊ लागले. उपस्थित नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत ओम प्रशांत बोचरे (वय २०) आणि आकाश विनोद वानखडे (वय २४) यांना सुरक्षित बाहेर काढले.

ओम बोचरे याच्यावर शेगाव येथील सईबाई मोटे रुग्णालयात, तर आकाश वानखडे याच्यावर अकोला शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून दोघांचीही प्रकृती स्थिर आहे.

घटनेची माहिती मिळताच सोनाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप काळे, पोलीस कर्मचारी शाकीर पटेल तसेच हिवरखेड पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वाण नदीला आलेल्या प्रचंड प्रवाहामुळे शोधमोहीमेत अडचणी निर्माण झाल्या होत्या. अखेर रविवारी सकाळी योगेश वानखडे याचा मृतदेह शोधण्यात यश आले.



दरम्यान, शेगाव येथील रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ओम बोचरे याची खामगावचे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिलीपकुमार सानंदा यांनी भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी पंकजाबराव देशमुख, विजय काटोले, मनोज वानखडे, नरहरी टिकार, पवन पचेरवाल, शिवा माळी, सैय्यद साजिद, संदीप शेजोळे, अशोक जशवाणी आदी उपस्थित होते.